<u>वार्तांकन</u> दि.१९/१०/२०१८

## पोलीस स्मृतिदिन २१ ऑक्टोबर २०१८

---

दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जातो. या दिवशी संपुर्ण वर्षात आपले कर्तव्य बजावित असताना कामी आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस दलातर्फे मानवंदना देऊन श्रध्दांजली वाहण्यात येते. हा दिवस पोलीस दलाला अभिमानाचा, शौर्याला मानवंदना देण्याचा,त्याचबरोबर आपल्या जुन्या सहका-यांच्या स्मृतीने मन हेलावणाराही असतो.

२१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जाण्यास १९५९ मध्ये लडाख भागातील सरहद्दीवर झालेली घटना कारणीभुत ठरली. भारत चीन सरहद्दीवर लडाख भागात १८ हजार फुट उंचीवर हॉट स्प्रिंग्ज नावाचे ठिकाण आहे. २१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हॉट स्पिंग्ज येथे गस्त चालु होती. गस्ती तुकडी नेहमी प्रमाणे गस्त घालण्यासाठी कुच करत हॉट स्पिंगच्या पुर्वेला ६ मैल दुर ती आली असताना पर्वताच्या डावे बाजुला तुकडीच्या नेत्याला काही काही संशयास्पद खुणा दिसल्या. तुकडी त्या खुणांच्या अनुरोधाने पुढे चालु लागली आणि अचानक भयानक गोळीबार सुरू झाला. त्याठिकाणी पोलीस वीरांनी शौर्याने तोंड दिले. ही विशेष लढाई लढता लढता यापैकी १० गस्ती शिपायांना वीरमरण आले व ९ जण जखमी अवस्थेत शत्रुच्या हाती सापडले. हे १० अमर शिपाई होते पुरणसिंग, धरमसिंग, इंद्रजित सुबा, नोरबु लामा, शिवनाथ प्रसाद, त्शेरिंग नोरबु, इमामसिंग, सवन सिंग, बेगराज आणि माखनलाल असे होते. त्यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या छावणीवरही अचानक चिनी सैन्यांनी हल्ला केला होता. या लढाईत कामी आलेल्या या शुर पोलीस जवानांपैकी पश्चिम बंगालचे -३, हरियाणा – २, पंजाब-२, उत्तर प्रदेश-२, हिमाचल प्रदेश-१ असे होते. ही बातमी वा-यासारखी सा-या देशभर पसरली. १३ नोव्हेंबरला चिनी सैनिकांनी या हुतात्म्यांचे मृतदेह भारताच्या ताब्यात दिले. १४ नोव्हेंबरला सकाळी ०८/०० वा. हॉट स्प्रिंग्ज येथे त्यांच्यावर सन्मानपुर्वक अंत्यविधी करण्यात आले. त्यावेळी प्रत्येक राज्यातील पोलीस दलांनी त्या त्या ठिकाणी या वीरांना श्रध्दांजली अर्पण केली.

त्यानंतर पाटणा येथे १९५९ साली झालेल्या अखिल भारतीय पोलीस स्पर्धांच्या वेळी सर्वांनी **'आमच्या हया वीर हुतात्म्यांचे स्मरण आम्ही दरवर्षी २१ ऑक्टोबरला पोलीस हुतात्मा दिन पाळुन करू'** अशी शपथ घेतली,आणि तेव्हापासुन दरवर्षी हा दिन भारतवर्षात मोठया सन्मानाने **'पोलीस हुतात्मा दिन'** म्हणुन पाळण्यात येतो. राज्या-राज्यातुन पोलीस दले या हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी संचलन आयोजीत करून त्यांना मानवंदना देतात.

दि.१ सप्टेंबर २०१७ ते ३१ ऑगस्ट २०१८ या कालावधीत देशातील सर्व राज्यात पोलीस दलाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस जवान (सर्व दर्जाचे) असे एकुण **<u>४१४</u>** जणांनी आपले कर्तव्य बजावित असताना देह धारातीर्थ ठेवले. त्यामध्ये महाराष्ट्रातील **१.पो.हवा.२३०७२,सुनिल दत्तात्रय कदम २.पो.हवा.२७२,सुरेश दत्तात्रय गावडे ३.पो.कॉ. १५८९,सतिश श्रध्दाराव मडवी** अशा एकुण **<u>०३</u>** या पोलीस जवानांचा समावेश आहे.

दिनांक २१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ०८/०० वा. पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे **मा. पद्मविभुषण डॉ.रघुनाथ अनंत माशेलकर (ज्येष्ठ शास्त्रज्ञ)** हे प्रमुख अतिथी म्हणुन वरील हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करणार आहेत.

तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की,आपण पोलीस हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी दि.२१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ०७/५० वा. उपस्थित राहावे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**